विधि व न्याय विभाग, मंत्रालय (खुद्द) च्या आस्थापनेवर "विधि सल्लागार - नि- सह सचिव", तसेच, "प्रारुपकार-नि-सह सचिव" या संवर्गात प्रत्येकी १ पद प्रमाणे एकूण २ पदे नव्याने निर्माण करण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्र. इएसटी -२०१९/प्र.क्र.२१४/का.दोन

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २९ जुलै, २०१९

<u>प्रस्तावना</u> :-

विधि व न्याय विभाग, मंत्रालय (खुद्द), नागपूर शाखा व औरंगाबाद शाखा या कार्यालयांची आस्थापना सामायिक असून या कार्यालयातील पदांचा आढावा घेऊन सुधारित आकृतीबंध वित्त विभागास सादर करण्यात आला होता. आकृतीबंधात विधि व न्याय विभाग, मंत्रालय (खुद्द), नागपूर शाखा व औरंगाबाद शाखा या कार्यालयातील विद्यमान मंजूर ३७२ पदांसह, विधि शाखेसाठी विविध संवर्गातील १७ अधिकच्या पदांची मागणी करण्यात आली होती. त्यानुषंगाने, प्रस्तावित ३७२ पदांऐवजी ३३६ पदांना मंजूरी देण्याचे वित्त विभागाने प्रस्तावित केलेले होते. तसेच, विभागाच्या ३३६ पदांचा सुधारित आकृतीबंध मंजुरीसाठी उप समिती समोर सादर करण्याच्या सूचना वित्त विभागाने दिलेल्या होत्या. विधि शाखेसाठी विविध संवर्गातील मागणी केलेल्या १७ नविन पदांच्या बाबतीत विभागाने सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता मिळाल्यानंतर नव्याने प्रस्ताव दिनांक १०.०९.२००१ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसार स्वतंत्रपणे सादर करण्याबाबत वित्त विभागाने सूचित केलेले होते.

२. तथापि, विभागातील कामकाजाची अडचण विचारात घेता, तुर्तास विभागाला "विधि सल्लागार-नि-सह सचिव" व "प्रारूपकार-नि-सह सचिव" या संवर्गात प्रत्येकी १ प्रमाणे एकूण २ पदांची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे, "विधि सल्लागार -नि-सह सचिव" संवर्गातील १ पद व "प्रारूपकार -नि-सह सचिव" या संवर्गातील १ पद अशा प्रकारे २ पदांच्या निर्मितीस मान्यता देण्यासाठीचा स्वतंत्र प्रस्ताव उच्चस्तर समितीसमोर सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास उच्चस्तर समितीने दि.१५.०७.२०१९ रोजी चक्रीय पध्दतीने मान्यता प्रदान केलेली आहे. त्याअनुसार, विधि व न्याय विभाग, मंत्रालय (खुद्द) च्या आस्थापनेवर "विधि सल्लागार-नि-सह सचिव" तसेच "प्रारुपकार-नि-सह सचिव" या संवर्गात प्रत्येकी १ प्रमाणे एकूण २ पदे नव्याने निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> :-

विधि व न्याय विभाग, मंत्रालय (खुद्द) च्या आस्थापनेवर "विधि सल्लागार -नि-सह सचिव" तसेच "प्रारूपकार-नि-सह सचिव" (गट-अ) संवर्गात प्रत्येकी १ प्रमाणे २ पदे (वेतन स्तर एस-२७ वेतन श्रेणी रु. १,१८,५००-२,१४,१००) कायमस्वरुपी निर्माण करण्यास व त्यानुषंगाने येणाऱ्या वार्षिक आवर्ती रु. **४०,१०,७६०/-**इतक्या अंदाजित खर्चास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. **कायमस्वरूपी निर्माण करावयाच्या २ पदांचा तपशील**

अ. क्र.	पदनाम	वेतन श्रेणी	पदांची संख्या	या पदांसाठी वेतन व भत्ते यासाठी होणारा अंदाजे मासिक आवर्ती खर्च	या पदांसाठी वेतन व भत्ते यासाठी होणारा अंदाजे वार्षिक आवर्ती खर्च
१.	विधि सल्लागार - नि-सह सचिव	११८५००-२१४१०० वेतन स्तर S-२७	१	रू.१,६७,११५/-	२०,०५,३८०/-
२.	प्रारुपकार- नि-सह सचिव	११८५००-२१४१०० वेतन स्तर S-२७	१	रू.१,६७,११५/-	२०,०५,३८०/-
	एकूण		**२**	**रू.३,३४,२३०/-**	**४०,१०,७६०/-**

३. वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली २ कायमस्वरुपी पदे सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार भरण्याबाबतची कार्यवाही विधि व न्याय विभागाकडून करण्यात येईल.

४. कायमस्वरूपी नवीन पदनिर्मितीमुळे होणारा खर्च " मागणी क्र.जे.-२, २०५२- सेक्रेटरीएट सर्वसाधारण सेवा (०९०) सेक्रेटरीएट (०१), विधि व न्याय विभाग (आस्थापना), (संकेतांक क्रमांक २०५२ ०२५९) ०१ वेतन" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो खर्च त्या त्या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय, वित्त विभागाने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र.३२७/आपुक, दि.१५.०७.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीस, तसेच, उच्चस्तर सचिव समितीने दिलेल्या मान्यतेस त्याचप्रमाणे, मंत्रिमंडळाच्या दि.१६.०७.२०१९ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१९०७३०१२३८३३१११२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Ashok Balkrishna Sadikale
Date: 2019.07.30 12:44:20 +05'30'

(अ. बा. सादिकले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय ,मुंबई.
२. मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय ,मुंबई.
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव (तथा अध्यक्ष, उच्चस्तर सचिव समिती) यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव व विधि परामर्शी यांचे स्वीय सहायक, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सचिव (विधि विधान) यांचे स्वीय सहायक, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र-१, मुंबई.
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२. वित्त विभाग, व्यय-५/अर्थ ११/वित्तीय सुधारणा/आपुक)
१३. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती.